–: प्रेसनोट :–                                   दि. २४/०३/२०२१

**यातील फिर्यादी यांच्या बिलांची रक्कम मंजुर करवुन देण्याकरीता यांतील आलोसे क्र. १ यांनी स्वत:करीता व वरिष्ठांकरीता रु. ९,८६,०००/– लाचेची मागणी केली. सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र. १ यांने स्वत:करीता व वरिष्ठांकरीता लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यास रंगेहात पकडण्यात आले. आलोसे क्र. २ यांनी त्यांच्या हिश्श्याची रक्कम आलोसे क्र. १ यांचेकडे देण्यास सांगुन गुन्हयास प्रोत्साहन दिले म्हणून गुन्हा नोंद**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद कमांक | १९/२०२१ |
| कलम | ७, १२ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ |
| आरोपीताचे नाव व कार्यालय | १. प्रकाश लक्ष्मण परब, ४५ वर्षे, भांडारपाल (वर्ग–३)<br>२. बीरेंद्र कुमार सिन्हा, वरिष्ठ विभागीय लेखा अधिकारी (वर्ग–१)<br>सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय, उत्तर मुंबई विभाग, अंधेरी (पश्चिम), मुंबई. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. ९,८६,०००/– |
| लाचेची स्विकारलेली रक्कम | रु. ४,२५,०००/– |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी या स्वच्छ भारत / स्वच्छ मुंबई यासाठी काम करतात. यामध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती तसेच विविध ठिकाणी निर्माण होणारे कचऱ्यांचे ओला कचरा व सुका कचरा असे वर्गीकरण करुन ओला कचऱ्यापासुन खत निर्मितीचे काम करतात<br>ऑगस्ट २०१८ पासुन त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, बांद्रा येथील गर्व्हमेंट कॉलनी येथे प्रायोगिक तत्वावर काम चालु केलेले आहे. त्यातील एकाच बिलाची रक्कम त्यांना मिळालेली आहे. त्यांच्या उर्वरीत एकुण बिलाची रक्कम एकुण २१,९३,०००/– रुपये असुन या बिलाची रक्कम मंजुर करवुन देण्यासाठी आलोसे क्र. १ यांनी एकुण बिलाच्या ४५% एवढया लाचेच्या रक्कमेची मागणी केली.<br>फिर्यादी यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ११/०१/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग कार्यालयात दिलेल्या तक्रारीवरुन पडताळणी करण्यात आली. दिनांक ०१/०२/२०२१ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान आलोसे क्र. १ यांनी एकुण बिलाच्या ४५% रक्कम रुपये ९,८६,०००/– इतक्या लाचेची मागणी स्वत:साठी व वरिष्ठांसाठी केली.<br>दिनांक २४/०३/२०२१ रोजी केलेल्या सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र. २ यांनी त्यांच्या हिश्यांची लाचेची रक्कम आलोसे क्र. १ यांचेकडे देण्यास सांगुन गुन्हयास प्रोत्साहन दिले. आलोसे क्र. १ यांनी स्वत:करीता व वरिष्ठांकरीता रु. ४,२५,०००/– इतक्या लाचेची रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडल्याने गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

सहाय्यक पोलीस आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

24/3/21

( निलिमा वाव्हळ )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवकाबददल तकार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३०
संकेतस्थळ–acbmaharastra.gov.in
ईमेल– १)acbwebmail@mahapolice.gov.in
२)addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.
ऑनलाईन तकार अर्ज–www.acbmaharastra.net. टोलफि. क्र. १०६४
दुरध्वनीक. ०२२ २४९२१२१२ फॅक्स. क्र. ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९३०९९७७००